चिंतन

आज दिनांक 11-05-2022
रोजी जे एक चिंतन काव्य

" मीच जग निर्मीले
मीच ते वाढवले
सारे माझेच हे चाळे
आहे मला उमजले ॥ "

या काव्य चिंतनावर सखोल भाष्य करणारे चिंतन post
करण्याची प्रेरणा अंतकरणात जागल्याने आता खालील चिंतन
समुहावर post करण्यात येत आहे .

👇👇

चिंतन

जिच्या मुळे आपल्याला मी आहे असा भास होतो ती एक अत्यंत पवित्र शाश्वत व चिरंतन पण शब्दातीत वस्तु
आपल्याच अंतरात आहे .

त्या शब्दातीत व कालातीत वस्तुचा बोध त्या वस्तुलाच
होणे म्हणजे आत्मज्ञान आहे .

ही पवित्रतम वस्तु म्हणजे
conscious
subconscious
unconscious .
unconscuios
व
universal consc. च्या पलिकडे असुन या चारही consc. चे म्हणजे
चारही अवस्थांचे / चारही देहांचे / चारही कोषांचे / चारही वाचांचे / चारही स्कंधांचे ते उगमस्थान आहे .

या मुळ तत्वाला बौद्ध साहीत्यात निर्वाण ( Nothingness ) किंवा परंपरेत निर्गुण निराकार / परब्रह्म असे
म्हटले गेले आहे .

या वस्तुचा शोध real meditation मधे
द्रष्टाच दृश्य आहे या बोधात
लागत असतो . असा शोध निर्हेतुकपणे अंतरंगत होणे
यालाच अध्यात्म ( spirituality )असे म्हटले गेले आहे .

या पवित्र वस्तुच्या अधीष्ठानावरच
प्रथम अज्ञानात " मी आहे " असा वैश्विक ब्रह्मभाव प्रकटत असतो .
जे अनंत व अपार असे पहिले पंचभुत आकाश आहे .

हा  वैश्विक  मीचा  ब्रह्मभाव  आकाश या पहिल्या पंचभुता सारखा  अनंत व अपार आहे ,  हा  मी पणाचा भाव वैश्विक ब्रह्मभाव या स्वरुपात असतो .
या अवस्थेलाच अद्वैत अवस्था ( तुर्या/ universal  consc.)  देखील म्हणतात .
या अवस्थेत
नाम - रुप  ( द्रष्टा - दृश्य ) हे
अद्वैत अवस्थेत ( nondual )  असते .

मी आहे हा  वैश्विक ब्रह्मभाव जेव्हा मी आहे  या अज्ञानाच्या  सघनतेने तुकडे तुकडे होवुन  परीछिन्न  अवस्थेला प्राप्त होतो  तेव्हा   दुसऱ्या पंचभुताचे म्हणजे वायु स्वरुपाची ची निर्मीती असते .
ही द्वैताची  म्हणजे  वैयक्तीक  जीवभावाची बीजावस्था आहे ,
seed of individuality आहे .
या  duality अवस्थेला  सुषुप्ती( unconscious)
असेही म्हटले जाते . जी  एक लहान फुग्याच्या  पोकळीसारखी  आकाश व वायुरुप अवस्था आहे .
या अवस्थेत
नाम - रुप ( द्रष्टा - दृश्य )
हे  द्वैत ( dual)   अवस्थेत असते .

या seed of individuality च्या  ठिकाणी  वैयक्तीक मन   निर्माण  झालेले असते
व
या वैयक्तीक मनाच्या ठिकाणी , जसे जसे चिंतन होईल तसे तसे  गुण , आकार ,  रुप  प्रकट होत ,  संपुर्ण जीवसृष्टीचे म्हणजे ,
संपुर्ण  वनस्पती सृष्टी ,
मानव सृष्टी ,
प्राणी सृष्टी ,
पक्षी सृष्टी ,
जलचर व उभयचर सृष्टी ,
किटक सृष्टी  ईत्यादी चे प्रकटन होत असते .

मानवी सृष्टीबाबत  या  seed of individuality / सुषुप्तीच्या  ठायीच सुक्ष्म मनरुपी  स्वप्न  अवस्था ( subconscious) प्रकटत असते
व
ही   स्वप्न अवस्था पुढे
पंचभुतात्मक स्थुल रुप धारण करत  जागृत  अवस्था ( waking state ) प्रकट होत विश्वाभास प्रकटत असतो .

या ज्या काही तुर्या , सुषुप्ती ,स्वप्न व  जागृत  या चा अवस्था निर्माण होतात ,   या चारी अवस्थांचे अधीष्ठान  ती शब्दातीत , कालातीत चिरंतन पवित्र वस्तुच  असते .

या  चारी अवस्थात  जो मी पणाचा  भास निर्माण होत असतो ,  त्या मीपणाचे अधीष्ठान ती पवित्र अशी कालातीत , शब्दातीत  वस्तुच असते .

सर्व प्रथम जेव्हा अनंत व अपार असे  पहिले पंचभुत आकाश निर्माण होते ,  तेव्हा
त्या पवित्र वस्तुचा विसर पवित्र वस्तुला पडतो व ती पवित्र वस्तु आकाशाशी तादात्म पावत
मी आकाश आहे असा भाव त्या जडाठायी निर्माण होतो

व अशा रीतीने
त्या पवित्र वस्तुमुळेच आकाशाच्या ठिकाणी
मी आकाश आहे असा
" अहम ब्रह्मास्मीचा " भाव प्रकटत असतो .

तर पुढच्या अवस्थेच्या प्रकटनावेळी म्हणजे सुषुप्ती / जीवभाव प्रकटनावेळी , जीवभावाच्या ठिकाणी
मी एक परीछिन्न individual जीव आहे
असा भास निर्माण होत व जीवाची निर्मीती होत असते .

या जीवाच्याच ठिकाणी पुढील अवस्थात स्वप्नसृष्टी व जागृती चा भास निर्माण होत , जगदाभास प्रकटत असतो .

अर्थात हे सर्व पुस्तक/ ग्रंथ वाचुन किंवा प्रवचन ऐकुन समजत नसते .

या सर्व गोष्टी real meditation मधील प्रत्यक्ष अनुभुतीशिवाय समजत नसतात ही देखील बाब खरीच आहे .

एकदा जीवभाव निर्माण झाला की मग त्या जीवाला स्वत:च्या
सुषुप्ती ,
तुर्या ( ब्रह्म ) ,
तुर्यातीत ( परब्रह्म )
या स्वरुपांचा विसर पडुन तो जीव मी शरीरधारी individuality आहे या भ्रमाला प्राप्त होवुन , स्वतः चे मुळ स्वरुपाचे विस्मरण झाल्याने सुख व शांतीच्या शोधात तृष्णा , ईच्छा , कामना व वासनाना प्राप्त होतो .

त्या शाश्वत व पवित्र वस्तुच्या
अधीष्ठानामुळे शरीरा ठायी निर्माण झालेला जीवभाव
आता स्वत:लाच शरीर म्हणजे मी , शरीराठायी असलेले ईंद्रिय म्हणजे माझे ईंद्रिय व शरीरासोबत भासणारे मन हे माझे मन अशा duality consciousness ला प्राप्त होवुन मी - माझे पणाच्या अनाकलनीय द्वैतात्मक , अज्ञानरुपी जन्म मरणाच्या भवचक्र रुपी पिंजऱ्यात कायमचा अलगद अडकुन जातो .

खरे तर त्या जीवाठायीचे भासणारा मी पणाचा भास हा पंचभुताठायीचा , मी पणाचा भ्रम असतो जो अनित्य , अनात्म व दु:ख असतो . पण या मी पणाचे खरे मुळ अधीष्ठान जे शाश्वत व चिरंतन तत्व आहे त्या तत्वाचा विसर त्या मी ला होवुन तो मी स्वताचे शाश्वत स्वरुप अज्ञानात विसरुन स्व:ताला जन्म मरण धर्मी जीव समजु लागते व अखंड जन्म मरणाला प्राप्त होतो .

संपुर्ण सृष्टी ही अत्यंत जलदगतीने
प्रतीक्षण उदय व्यय पावत असते व पंचभुताठायी भासणरा हा मी पणाचा भास देखील प्रतिक्षण उदय व्ययाच्या अधीन असतो , पण अत्यंत जलदगतीने होणारा व उदयव्यय न उमजल्याने हा भास एका जीवभावाच्या अखंड भासाला जन्म देत असतो .

जीवभावाचे अधीष्ठान शरीर असते . शरीराचे अधीष्ठान सुषुप्ती असते
तर
सुषुप्तीचे अधीष्ठान तुर्या असते
व
तुर्येचे अधीष्ठान ती शब्दातीत चिरंतन वस्तु असते .

त्या आपल्याच मुळ पवित्र , शब्दातीत , कालातीत स्वरुपाचा विसर जीवाला पडणे यालाच अज्ञान वा अविद्या वा ignorance म्हणतात .

जागृती स्वप्न व सुषुप्ती या द्वैतात्मक अज्ञान अवस्था असतात तर तुर्या ही अद्वैतात्मक आकाशा सारखी ज्ञानरुपी पण अज्ञान अवस्थाच असते .

ती पवित्र शाश्वत चिरंतन वस्तु मात्र ज्ञान अज्ञान या दोहो पलिकडे असते .

खरे तर त्या पवित्र शाश्वत चिरंतन वस्तुचा या चार अवस्थात्मक अस्तित्वाशी काहीच संबंध नाही , ती पवित्र वस्तु केवळ अधीष्ठान मात्र आहे .

त्या पवित्र वस्तुचा या चार अवस्थात्मक पंचभुतात्मक
जड घडामोडीशी काहीही संबंध नाही .

त्या पवित्र वस्तुच्या ठिकाणी कोणताही मी पणाचा वा तु पणाचा भावच नाही . हा सर्व
मी - तु चा भाव हा पंचभुताठायी आहे जे एक illusion आहे .

चार अवस्था एक illusion आहे
व चार अवस्थांच्या अधीष्ठानावर भासणारा विश्वाभास हा ही एक illusion च आहे .

सर्व पंचभुते व पंचभुताठायी भासणारी सर्व जीवसृष्टी , सर्व वनस्पती सृष्टी , सर्व प्राणी सृष्टी
सर्व मानवी सृष्टी ही illusion च आहे .

परमसत्य हे
द्वैत अद्वैता पलिकडे ,
असणे नसणे पलिकडे ,
रुप - अरुपा पलिकडे ,
जीव - ब्रह्मा पलिकडे ,
सगुण निर्गुणा पलिकडे ,
ज्ञान - अज्ञान पालिकडे आहे .

जीवाला जो सुखाचा , शांतीचा , आनंदाचा शोध आहे , तो शोध म्हणजे त्या मुळ पवित्र शाश्वत
चिरंतनाचा म्हणजे स्वस्वरुपाचा शोध आहे .

आपण सर्व ती पवित्र चिरंतन शब्दातीत व कालातीत वस्तु आहोत . आपल्या सर्वांच्या मुळ स्वरुपाठायी ईच्छा , वासना , कामना , काम ,क्रोध ,लोभ, मद, मोह , मत्सर , भय , जन्म, मृत्यु , स्वर्ग , नरक ईत्यादी विकार अस्तित्वातच नाहीत .

चारी अवस्थातील , पंचभुताशी संबंधीत मी पणाचा भ्रम जर द्रष्टाच दृश्य आहे या समजेत जर निरास पावु शकला तर त्या
शाश्वत व चिरंतनाची ओळख त्या शाश्वत चिरंतनाला होत असते .

पंचभुते , चारी अवस्था , शरीर , मन बुद्धी , विचार , भावना व पाचही ईंद्रिये यामुळे निर्माण होणाऱ्या मी पणाच्या अनुभव रुपी भासाशी समुळ तादात्म तुटले असता स्वस्वरुपाचा बोध स्वस्वरुपाला होत असतो .

पण आपलेच , आपल्या मी पणाशी ईतके तादात्म्य आहे की
या मी पणाचा निरास म्हणजे आपण आपला मृत्यु समजतो
व
म्हणुन मृत्युच्या भितीने ,
आपले आपल्या मी पणाशी कधीच तादात्म्य तुटत नसते
व
आपण कधीच स्वरुपबोधाला प्राप्त होत नसतो .

मी पणाशी तादात्म्य तुटणे ही मृत्युची अनुभुती आहे .

द्रष्टाच दृश्य आहे
समजेतुन हे चारी अवस्थातील मी शी असलेले तादात्म्य तुटावे लागते , तेव्हा कुठे स्वरुपाची गाठ स्वरुपाशी पडत असते .

द्रष्टाच दृश्य आहे या बोधातुन ,
चारी अवस्थेतील मी पणाचा भास विरणे हीच आत्मज्ञानाची गुरुकिल्ली आहे .

ही गुरुकिल्ली फक्त बुद्ध , माउली व कृष्णमुर्ति सारख्या महान विभुतीनी सांगीतली आहे .

बाकीचे सर्व पारंपारीक गुरु
व परंपरा द्रष्टा हा दृश्यापेक्षा भिन्न असतो असे अज्ञानच सांगताना आढळले आहेत .

असो .

09822992578

11-05-2022

vbpandhare@gmail.com

.........................................